मराठा आरक्षणाचा मुद्दा पुन्हा पेटणार; मनोज जरांगेंची ३० मे रोजी राज्यव्यापी आंदोलनाची घोषणा

जालना, दि. १६ (वार्ताहर): मराठा आरक्षणाच्या मागणीवरून राज्यातील राजकीय आणि सामाजिक वातावरण पुन्हा तापण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. मराठा आंदोलनाचे प्रमुख नेते मनोज जरांगे पाटील यांनी ३० मे रोजी राज्यभर मोठे आंदोलन छेडण्याची घोषणा केली असून, सरकारला थेट इशाराही दिला आहे. जालना जिल्ह्यातील अंतरवली सराटी येथे आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी आंदोलनाची नवी दिशा आणि पुढील रणनीती जाहीर केली. मनोज जरांगे पाटील यांनी सरकारवर आश्वासनपूर्ती न केल्याचा गंभीर आरोप केला. मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याबाबत, हैदराबाद गॅझेटियरमधील नोंदींची अंमलबजावणी आणि आंदोलनादरम्यान दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घेण्याबाबत शासनाने अद्याप ठोस निर्णय घेतलेला नसल्याचे त्यांनी म्हटले. "आठ महिने उलटून गेले तरी पात्र नागरिकांना प्रमाणपत्रे मिळालेली नाहीत. सरकारने दिलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी का होत नाही, याचे उत्तर द्यावे," अशी मागणी त्यांनी केली.

हैदराबाद गॅझेटियरच्या आधारे सुमारे ३०८ प्रमाणपत्रांचे वितरण झाले होते. मात्र त्यानंतर प्रक्रिया थांबल्याचा आरोप करत जरांगे यांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. तसेच शिंदे समितीच्या कामकाजावरही त्यांनी नाराजी व्यक्त केली. समितीला वारंवार मुदतवाढ देण्यात येत असली तरी तळागाळातील नोंदी शोधण्याचे काम संथ गतीने सुरू असल्याचा दावा त्यांनी केला.

यावेळी त्यांनी राज्यभरातील ग्रामपंचायतींमध्ये ५८ लाख नोंदी सार्वजनिकरित्या प्रदर्शित करण्याची मागणी केली. त्यामुळे समाजाला खरी परिस्थिती समजेल आणि पारदर्शकता राहील, असे ते म्हणाले. तसेच सातारा संस्थानाशी संबंधित शासन निर्णय लवकर जाहीर करण्याचे आश्वासनही अद्याप पूर्ण झाले नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

३० मे रोजी होणारे आंदोलन शांततेत पार पडेल, असे स्पष्ट करत त्यांनी राज्यभरातील मराठा समाजाला मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले. या घोषणेनंतर मराठा आरक्षणाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, आगामी काळात राज्यातील राजकीय घडामोडींना वेग येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

कांद्याच्या दरावरून शेतकरी संतप्त; केंद्राच्या खरेदी दराविरोधात आंदोलनाचा इशारा

लासलगाव, दि. १६ (वार्ताहर) : राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करत असताना केंद्र सरकारने १२ रुपये ३५ पैसे प्रति किलो दराने कांदा खरेदी करण्याची घोषणा केली आहे. मात्र हा दर उत्पादन खर्चाच्या तुलनेत अत्यंत कमी असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून, विविध शेतकरी संघटनांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे. "ही मदत नसून शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार आहे," अशी प्रतिक्रिया संतप्त शेतकऱ्यांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

गेल्या काही दिवसांपासून राज्यातील विविध बाजार समित्यांमध्ये कांद्याचे दर कोसळले आहेत. काही ठिकाणी तर शेतकऱ्यांना अवघ्या एक रुपया प्रतिकिलो दराने कांदा विकण्याची वेळ आली आहे. विक्रमी उत्पादन झाल्यानंतरही बाजारात योग्य भाव मिळत नसल्याने शेतकरी हतबल झाले आहेत. अशा परिस्थितीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्र सरकारकडे हस्तक्षेप करण्याची मागणी केली होती. त्यानंतर केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी नाफेड आणि राष्ट्रीय सहकारी ग्राहक महासंघामार्फत १५ मेपासून कांदा खरेदी सुरू करण्याची घोषणा केली.

मात्र केंद्राने जाहीर केलेला १२.३५ रुपये प्रति किलो दर शेतकऱ्यांच्या अपेक्षेपेक्षा खूपच कमी असल्याची टीका होत आहे. बियाणे, खते, औषधे, मजुरी आणि वाहतूक खर्च मोठ्या प्रमाणात वाढले असताना या दरातून उत्पादन खर्चही निघत नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. कांदा उत्पादक शेखर कदम यांनी "लाखो रुपये खर्च करून पिकवलेल्या मालाला तुटपुंजा दर देणे म्हणजे शेतकऱ्यांची थट्टा आहे," अशी संतप्त प्रतिक्रिया दिली. खासदार भास्कर भगरे यांनीही या निर्णयावर नाराजी व्यक्त करत सरकारने थेट बाजार समित्यांमधील लिलाव प्रक्रियेत उतरून कांदा खरेदी करावी, अशी मागणी केली.

खामगावचा 'ग्रीन पॅटर्न' ठरतोय आदर्श; उद्यानांमुळे शहराचा बदलतोय चेहरामोहरा

वाशीम, दि. १६ (वार्ताहर): बुलढाणा जिल्ह्यातील व्यापारी नगरी म्हणून ओळख असलेल्या खामगाव शहराने हिरवाईच्या माध्यमातून विकासाचा नवा आदर्श निर्माण केला आहे. शहराच्या विविध भागांत उभारण्यात आलेल्या १५ ते २० लहान-मोठ्या उद्यानांमुळे खामगावचा चेहरामोहरा झपाट्याने बदलताना दिसत असून, नागरिकांच्या दैनंदिन जीवनशैलीतही सकारात्मक परिवर्तन घडत आहे. 'ग्रीन पॅटर्न' म्हणून ओळख निर्माण करणाऱ्या या उपक्रमामुळे खामगाव इतर शहरांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

शहरातील उद्यानांनी केवळ सौंदर्यवृद्धीच केली नसून, ती नागरिकांच्या विरंगुळ्याची आणि सामाजिक संवादाची महत्त्वाची केंद्रे बनली आहेत. अभ्यासाच्या ताणातून वेळ काढत संध्याकाळी उद्यानांमध्ये खेळणाऱ्या मुलांच्या चेहऱ्यावरचा आनंद पालकांनाही समाधान देणारा ठरत आहे. ही उद्याने तरुण आणि ज्येष्ठ नागरिकांसाठीही आरोग्यदायी ठिकाणे ठरत आहेत.

पहाटेच्या वेळी अनेक नागरिक येथे चालणे, योगासने, व्यायाम आणि ध्यानधारणा करताना दिसतात. शहराच्या धकाधकीच्या जीवनातून काही क्षण शांततेत घालवण्यासाठी उद्यानांना मोठी पसंती मिळत आहे. विशेष म्हणजे मोठ्या प्रमाणावर करण्यात आलेल्या वृक्षलागवडीमुळे वाढत्या तापमानात काहीसा दिलासा मिळत असून, पर्यावरण संवर्धनालाही हातभार लागत आहे.

पुण्यात डेंग्यूचा वाढता प्रादुर्भाव; वर्षभरात २६४५ संशयित रुग्ण



पुणे, दि. १६ (वार्ताहर) : पुणे शहरात डेंग्यूच्या रुग्णसंख्येत चिंताजनक वाढ होत असल्याचे चित्र समोर आले असून, महापालिकेचा आरोग्य विभाग हायअलर्टवर आला आहे. जानेवारी २०२५ ते जानेवारी २०२६ या कालावधीत शहरात तब्बल २६४५ संशयित डेंग्यू रुग्ण आढळले असून, त्यापैकी १०९ रुग्णांचे नमुने पॉझिटिव्ह आढळल्याची माहिती महापालिकेच्या कीटक नियंत्रण विभागाच्या अहवालातून समोर आली आहे. याशिवाय चिकुनगुनियाचे २२ रुग्णही नोंदविण्यात आले आहेत. डेंग्यूच्या वाढत्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर महापालिकेकडून जनजागृती मोहिमेला वेग देण्यात आला आहे. दरवर्षी १६ मे रोजी राष्ट्रीय डेंग्यू दिन साजरा केला जातो. यंदाच्या वर्षी 'एक व्हा, कृती करा, निर्मूलन करा' ही संकल्पना घेऊन नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यावर भर दिला जात आहे. डासांची पैदास रोखणे, परिसर स्वच्छ ठेवणे आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांमध्ये नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढवणे, हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.

महापालिकेच्या आकडेवारीनुसार, जुलै आणि ऑगस्ट महिन्यात डेंग्यूचा प्रादुर्भाव सर्वाधिक वाढल्याचे दिसून आले. ऑगस्ट महिन्यात सर्वाधिक ७६५ संशयित रुग्णांची नोंद झाली, तर जुलै महिन्यात ३८ रुग्ण पॉझिटिव्ह आढळले. पावसाळ्यात साचलेल्या पाण्यात एडीस डासांची पैदास वेगाने वाढत असल्याने बांधकाम साईट्स, सोसायट्यांमधील पाण्याच्या टाक्या, कुलर, कुंड्या आणि गच्च्यांवरील पाण्याकडे विशेष लक्ष देण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

डेंग्यू नियंत्रणासाठी महापालिकेकडून विविध भागांत तपासणी मोहीम राबविण्यात येत असून, वर्षभरात तब्बल ३०२९ नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांकडून सुमारे ६ लाख १९ हजार रुपयांचा दंडही वसूल करण्यात आला आहे. शहरात डेंग्यूमुळे अद्याप एकाही मृत्यूची नोंद नसल्याने प्रशासनाने काहीसा दिलासा व्यक्त केला असला, तरी परिस्थिती गांभीर्याने हाताळली जात आहे.

आरोग्य तज्ज्ञांच्या मते, ताप, अंगदुखी, डोकेदुखी, मळमळ, अशक्तपणा आणि त्वचेवर पुरळ ही डेंग्यूची सुरुवातीची लक्षणे असू शकतात. ताप आल्यास स्वतःहून औषधे घेण्याऐवजी त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

'घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६'ची कठोर अंमलबजावणी

नवी मुंबईचा 'सुपर स्वच्छ' मान कायम राखण्याचा निर्धार

नवी मुंबई, दि. १६ (वार्ताहर) : देशातील सर्वाधिक स्वच्छ शहरांमध्ये सातत्याने अग्रक्रम राखणाऱ्या नवी मुंबई महानगरपालिकेने आता 'घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६'ची काटेकोर अंमलबजावणी करून 'सुपर स्वच्छ लीग'मधील आपले मानांकन कायम राखण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. 'स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६'च्या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि नागरिक यांच्या संयुक्त सहभागातून शहरात व्यापक स्वच्छता मोहीम उभारली जाणार आहे. 'स्वच्छ भारत मिशन'अंतर्गत सातत्याने देशातील सर्वोत्तम स्वच्छ शहरांमध्ये स्थान मिळवणाऱ्या शहरांसाठी केंद्र शासनाने 'सुपर स्वच्छ लीग' ही विशेष श्रेणी निर्माण केली आहे. या प्रतिष्ठेच्या यादीत नवी मुंबईचा अग्रक्रमाने समावेश असून, शहराची स्वच्छ प्रतिमा अधिक बळकट करण्यासाठी नव्या नियमांनुसार कामकाज सुरू करण्यात आले आहे. यापूर्वी घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ नुसार कचरा संकलन, वाहतूक, प्रक्रिया आणि विल्हेवाट यावर भर दिला जात होता. मात्र, १ एप्रिल २०२६ पासून लागू झालेल्या नवीन नियमांमध्ये नागरिक आणि लोकप्रतिनिधींची थेट जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी सर्व नगरसेवक, गृहनिर्माण संस्था आणि नागरिकांना पत्राद्वारे नव्या नियमांची माहिती देत स्वच्छतेला लोकचळवळीचे स्वरूप देण्याचे आवाहन केले आहे. "माझं शहर – माझा सहभाग" हा संदेश नागरिकांच्या मनात रुजवून प्रत्येकाने घरातूनच कचऱ्याचे ओला, सुका, घरगुती घातक आणि सॅनिटरी असे चार प्रकारांमध्ये वर्गीकरण करावे, असे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच महापालिकेच्या कचरा वाहनांमध्येही कचरा स्वतंत्रपणे देणे बंधनकारक करण्यात आले आहे.

मुंबईत ऑनलाईन फसवणुकीचा कहर; वर्षभरात २२ हजार ५०० कोटींची लूट, सायबर गुन्ह्यांत मोठी वाढ

मुंबई, दि. १६ (प्रतिनिधी) : आर्थिक व्यवहारांचे वाढते डिजिटलीकरण आणि मोबाईलच्या वाढत्या वापरासोबतच मुंबईत ऑनलाईन फसवणुकीच्या घटनांमध्ये चिंताजनक वाढ होत असल्याचे समोर आले आहे. गेल्या वर्षभरात मुंबईत विविध प्रकारच्या सायबर आणि ऑनलाईन फसवणुकीत तब्बल २२ हजार ५०० कोटी रुपयांची लूट झाल्याची धक्कादायक माहिती मुंबई दूरसंचार विभागाचे प्रमुख तथा अप्पर महानिर्देशक आशिष पाठक यांनी दिली. मागील पाच वर्षांत सायबर गुन्हेगारीतून ५२ हजार कोटींपेक्षा अधिक रक्कम लुटली गेल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

मुंबई प्रेस क्लब येथे 'संचार साथी' ॲप संदर्भात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी सांगितले की, आर्थिक फसवणुकीसंदर्भात राष्ट्रीय हेल्पलाईन क्रमांक १९३० वर गेल्या वर्षी तब्बल ३० लाख कॉल प्राप्त झाले. मात्र त्यापैकी केवळ ५५ हजार प्रकरणांमध्ये अधिकृत गुन्हे नोंदविण्यात आले. अनेक नागरिक तक्रार नोंदविण्यापर्यंत पोहोचत नसल्याने प्रत्यक्ष फसवणुकीचे प्रमाण यापेक्षा अधिक असण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

ऑनलाईन गुन्ह्यांमध्ये 'पैसे दुप्पट करून देतो', गुंतवणुकीवर जास्त परतावा, बनावट बँक अधिकारी, लिंक पाठवून खाते रिकामे करणे आणि बनावट मोबाईल ॲपच्या माध्यमातून फसवणूक करण्याच्या घटना सर्वाधिक असल्याचे त्यांनी सांगितले. महाराष्ट्रातील एकूण सायबर फसवणुकींपैकी जवळपास २० टक्के प्रकरणे ही आर्थिक व्यवहारांशी संबंधित असल्याचेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान, 'संचार साथी' ॲपमुळे नागरिकांना हरवलेले मोबाईल हँडसेट ब्लॉक करणे, संशयास्पद क्रमांकांची तक्रार करणे आणि फसवणुकीबाबत त्वरित माहिती देणे अधिक सोपे झाले आहे. या ॲपच्या मदतीने सुमारे ८ हजार कोटी रुपयांचे नुकसान वाचवण्यात यश आल्याचा दावा दूरसंचार विभागाने केला आहे.

याशिवाय दोन बनावट कॉल सेंटरवर कारवाई करून ती बंद करण्यात आली असून, बंद केलेल्या मोबाईल क्रमांकांची माहिती बँकांना देण्यात येत असल्याचेही पाठक यांनी सांगितले.

पुण्यात अत्याधुनिक कर्करोग केंद्राचे आज उद्घाटन; महापालिकेच्या आरोग्य सेवेत नवा टप्पा

पुणे, दि. १६ (वार्ताहर) : पुणे महापालिका आणि अपुलकी वैद्यकीय सेवा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने बाणेर येथे उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक कर्करोग व हृदयरोग रुग्णालयाचे आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण होणार आहे. वाढत्या कर्करोग रुग्णसंख्येच्या पार्श्वभूमीवर उभारण्यात आलेला हा प्रकल्प पुण्यातील आरोग्य सेवांसाठी महत्त्वाचा मैलाचा दगड मानला जात आहे.

सुमारे १६५ कोटी रुपयांच्या खर्चातून उभारण्यात आलेल्या या १५० खाटांच्या रुग्णालयासाठी पुणे महापालिकेकडून जागा उपलब्ध करून देण्यात आली असून, उर्वरित खर्च आणि व्यवस्थापनाची जबाबदारी अपुलकी वैद्यकीय सेवा केंद्राकडे सोपविण्यात आली आहे. सार्वजनिक-खासगी भागीदारी तत्त्वावर उभारण्यात आलेले हे राज्यातील महत्त्वाचे कर्करोग उपचार केंद्र ठरणार आहे. सर्वसामान्य रुग्णांना परवडणाऱ्या दरात उपचार उपलब्ध व्हावेत, यासाठी केंद्र शासनाच्या आरोग्य योजनेनुसार उपचार सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहेत.

रुग्णालयात कर्करोग निदान आणि उपचारासाठी अत्याधुनिक यंत्रसामग्री बसविण्यात आली आहे. कर्करोग पेशींवर अचूक उपचार करणारी उच्च क्षमतेची यंत्रणा, प्रगत तपासणी सुविधा, ऊतक तपासणी, स्तन तपासणी केंद्र, आधुनिक शस्त्रक्रिया विभाग आणि सर्वसाधारण आरोग्य सेवा येथे उपलब्ध असणार आहेत. त्यामुळे रुग्णांना विविध तपासण्यांसाठी वेगवेगळ्या रुग्णालयांमध्ये जाण्याची गरज भासणार नाही. या केंद्रात ४० हून अधिक तज्ज्ञ डॉक्टर आणि सुमारे चारशे कर्मचारी चोवीस तास सेवा देणार आहेत. पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागासाठी हा प्रकल्प ऐतिहासिक ठरणार असून, विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील रुग्णांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

मुंब्र्यात 'ड्रम प्रकरणा'ने खळबळ; प्रेमीची हत्या करून मृतदेह नाल्यात फेकल्याचा आरोप

मुंबई, दि. १६ (प्रतिनिधी) : उत्तर प्रदेशातील मेरठ येथील गाजलेल्या 'ड्रम प्रकरणा'नंतर आता मुंबईतील मुंब्रा परिसरातही तशाच स्वरूपाची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. एका महिलेने पती आणि भावाच्या मदतीने आपल्या प्रेमीची हत्या करून त्याचा मृतदेह हिरव्या रंगाच्या ड्रममध्ये भरून नाल्यात फेकल्याचा आरोप समोर आला आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून, पोलिसांनी आरोपी महिला आणि तिच्या भावाला अटक केली आहे.

या प्रकरणाची सुरुवात बेपत्ता तक्रारीपासून झाली. मुंब्रा परिसरात राहणारा अरबाज कमसूद अली खान हा दादरला जात असल्याचे सांगून घराबाहेर पडला होता. मात्र बराच वेळ उलटल्यानंतरही तो घरी परतला नाही. कुटुंबीयांनी नातेवाईक आणि मित्रांकडे चौकशी केली, परंतु त्याचा कोणताही मागमूस लागला नाही. अखेर कुटुंबीयांनी मुंब्रा पोलीस ठाण्यात बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली.

तपासादरम्यान पोलिसांनी अरबाजच्या मोबाईलचे शेवटचे स्थान आणि कॉल तपशीलांची छाननी केली. त्यावेळी त्याचे शेवटचे स्थान वर्सोवा परिसरात असल्याचे स्पष्ट झाले. विशेष म्हणजे त्याच परिसरात त्याची परिचित महिला मेहजबीन शेख हिच्या मोबाईलचे स्थानही आढळून आले. यानंतर पोलिसांनी संशयाच्या आधारे मेहजबीनला ताब्यात घेत चौकशी सुरू केली.

प्राथमिक चौकशीत मेहजबीनने दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी तांत्रिक पुरावे आणि सखोल चौकशीच्या आधारे तपासाची कडी उलगडताच तिने गुन्ह्याची कबुली दिल्याची माहिती समोर आली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, मेहजबीनने पती हसन आणि भाऊ तारिक शेख यांच्या मदतीने अरबाजला पैशांच्या व्यवहाराच्या बहाण्याने वर्सोवा येथे बोलावले होते. त्यानंतर त्याच्यावर हल्ला करून त्याची हत्या करण्यात आली. अरबाजचे हात-पाय बांधून त्याला प्लास्टिकच्या जाड पाईपने मारहाण करण्यात आल्याचा आरोप आहे. हत्या केल्यानंतर पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह मोठ्या हिरव्या रंगाच्या ड्रममध्ये भरून मुंब्र्यातील एका निर्जन नाल्यात फेकण्यात आला. पोलिसांनी तपासादरम्यान नाल्यातून मृतदेह हस्तगत केला असून, शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे. मुंब्रा पोलिसांनी तातडीने कारवाई करत मेहजबीन शेख आणि तिचा भाऊ तारिक शेख यांना अटक केली आहे.

उच्चदाब वीजतारेचा झटका बसून तरुण गंभीर भाजला

पिंपरी, दि. १६ (वार्ताहर) : महावितरण कंपनीच्या कथित निष्काळजी आणि अनागोंदी कारभारामुळे नौदलात जाण्याचे स्वप्न पाहणारा १७ वर्षीय तरुण गंभीर जखमी झाल्याची धक्कादायक घटना पिंपरी-चिंचवड परिसरात घडली आहे. घराच्या गच्चीलगत टाकण्यात आलेल्या उच्चदाब विद्युत वाहक तारेचा झटका बसल्याने संबंधित तरुण तब्बल ६५ टक्के भाजला असून त्याच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

अनिरुद्ध प्रशांत पाटील (वय १७, रा. चऱ्होली खुर्द) असे जखमी तरुणाचे नाव आहे. अनिरुद्ध बारावीमध्ये शिक्षण घेत असून नौदलात भरती होण्याचे त्याचे स्वप्न होते. तायक्वांदो या क्रीडा प्रकारातही तो प्राविण्य मिळवत होता. उन्हाळ्याच्या उकाड्यामुळे तो घराच्या गच्चीवर झोपण्यासाठी गेला असता, गच्चीजवळून गेलेल्या उच्चदाब वीजतारेच्या संपर्कात आला आणि त्याला जोरदार विजेचा धक्का बसला. उपचाराचा खर्च परवडत नसल्याने नंतर त्याला पिंपरीतील रुग्णालयात हलविण्यात आले आहे. पाटील कुटुंबीयांनी २०१८ मध्ये चऱ्होली परिसरात घर बांधले होते. मात्र, वर्षभरापूर्वी महावितरणकडून कोणतीही पूर्वपरवानगी न घेता घरांच्या अगदी जवळून धोकादायक पद्धतीने उच्चदाब वीजतारा टाकण्यात आल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. या निष्काळजीपणामुळेच मुलाच्या जीवावर बेतल्याचा आरोप अनिरुद्धची आई अर्चना पाटील यांनी केला असून, दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई आणि उपचाराचा संपूर्ण खर्च महावितरणने उचलावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

महावितरणच्या चाकण उपविभागीय कार्यालयाकडून या प्रकरणाची चौकशी सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे.

बैंक ऑफ़ बड़ौदा
Bank of Baroda

बैंक ऑफ बडोदा
नवी मुंबई प्रादेशिक कार्यालय: ४०५, चौथा मजला, प्लॅटिनम टेक्नो पार्क, कर्नाटक भवनसमोर, रघुलीला मॉलच्या मागे, वाशी – ४००७०२ **ई-मेल:** recovery.navimumbai@bankofbaroda.co.in

परिशिष्ट IV-A [नियम ८(६) आणि ६(२) मधील तरतुदींनुसार] स्थावर व जंगम मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली, २००२ च्या नियम ६ (२) आणि ८ (६) च्या तरतुदीसह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत,स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना

याद्वारे सर्वसाधारण जनतेस आणि विशेषतः कर्जदार व हमीदार यांना सूचना देण्यात येते की, खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता, जी सुरक्षित कर्जदार बँक ऑफ बडोदा यांच्याकडे तारण/भारित असून, जिचा ताबा बँक ऑफ बडोदा, सुरक्षित कर्जदार यांच्या अधिकृत अधिकाऱ्याने घेतलेला आहे, ती खाली नमूद खात्यांच्या वसुलीसाठी **"जशी आहे जिथे आहे", "जशी आहे तशी आहे" आणि "जे काही आहे तेथे आहे"** या तत्त्वावर विकली जाईल. कर्जदार/हमीदार/सुरक्षित मालमत्ता/थकबाकी/राखीव किंमत/ई-लिलावाची तारीख व वेळ, ईएमडी आणि बोली वाढ रक्कम यांचे तपशील खाली नमूद केले आहेत.

क्र.	कर्जदार / हमीदार यांचे नाव व पत्ता	स्थावर मालमत्तेचे वर्णन व ज्ञात बोजे, असल्यास	एकूण थकबाकी	ई-लिलावाची तारीख व वेळ	१. राखीव किंमत २. मालमत्तेची इरठे रक्कम ३. बोली वाढ रक्कम	ताब्याची स्थिती (रचनात्मक/ प्रत्यक्ष)	मालमत्ता पाहणी तारीख व वेळ / संपर्क व्यक्ती
१.	**कर्जदार: श्री. नदीम हुसेन कच्छी सह-कर्जदार: सौ. नुजहत नदीम कच्छी** पत्ता: खान मोहल्ला, पोस्ट-पेण, ता. पेण, रायगड – ४०२१०७	समन्यायी तारणाचा भूखंड जो फ्लॅट क्र. २०३, दुसरा मजला, सावित्री अपार्टमेंट, गट नं. ३६५/बी२, तरुण प्लांटेशन कंपनी जवळ, खोपोली- पेण रोड, गाव आंबेघर, ता. पेण, जि. रायगड – ४०२१०७ येथे स्थित आहे, कार्पेट क्षेत्रफळ – ६३१ चौ. फूट. **बँकेस ज्ञात भार: ज्ञात नाही**	रुपये १७,३१,८०४.०७/- दिनांक १६.०५.२०२६ पर्यंत तसेच त्यावरील इतर खर्च	२२.०६.२०२६ दुपारी ०२.०० ते सायं. ०६.००	**१) रुपये १५,४२,०००/- २) रुपये १,५४,२००/- ३) रुपये १०,०००/-**	सांकेतिक	**१८.०६.२०२६** सकाळी ११.०० ते दुपारी ०२.०० श्री. विशाल भड – ९४२६३५९००२

विक्रीच्या सविस्तर अटी व शर्तींसाठी कृपया वेबसाइट लिंक https://www.bankofbaroda.in/e-auction.htm आणि ऑनलाइन लिलाव पोर्टल **https://baanknet.com** येथे भेट द्या. तसेच इच्छुक बोलीदार अधिकृत अधिकाऱ्यांशी **दूरध्वनी क्र. ०२२-२७८१०६७०, मोबाईल ८४२४०००१६९** वर संपर्क साधू शकतात.

दिनांक: १६-०५-२०२६
ठिकाण: वाशी, नवी मुंबई

स्वाक्षरी/-
अधिकृत अधिकारी
बैंक ऑफ बडोदा

बैंक ऑफ़ बड़ौदा
Bank of Baroda

प्रभादेवी शाखा
कामना को-ऑप हाउसिंग सोसायटी, एस. के. बोले रोड, प्रभादेवी, मुंबई-४०००२५
दूरध्वनी: ९१२२ २४३८ ०११२/२४२२ ९४४०/ ९१ २२ २४३६ १९९७/२४२२ ७३८१
ईमेल: Prabha@Bankofbaroda.com

ताबा सूचना
(स्थावर मालमत्तेसाठी) परिशिष्ट IV [नियम-८ (१)]

ज्याअर्थी, बँक ऑफ बडोदाचे प्राधिकृत अधिकारी म्हणून खालील स्वाक्षरीकर्त्यांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (२००२ चा ५४) अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ३ सह वाचित कलम १३ (१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून दिनांक १५-०९-२०२५ रोजी मागणी सूचना जारी केली आणि कर्जदार/गहाणखतदार/जामीनदार **मेसर्स एन. जयंत कुमार मार्केटिंग कं., श्री नीरज नवीन शाह, सौ. निर्मला नवीन शाह आणि सौ. जिनाली नीरज शाह** यांना सूचनेत नमूद केलेली रक्कम **रु. १,४९,५४,४५२.६१/- (रुपये एक कोटी एकोणपन्नास लाख चौपन्न हजार चारशे बावन आणि पैसे एकसष्ठ फक्त) दि. ०८-०९-२०२५** रोजी देय असल्याप्रमाणे सदर रकमेवरील कराराच्या दराने अधिक व्याज आणि प्रासंगिक खर्च/मूल्य, आकार इत्यादी सदर सूचना प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत परतफेड करण्यास सांगितले होते.

कर्जदार/गहाणखतदार/जामीनदार रकमेची परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, याद्वारे कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की खालील स्वाक्षरीकर्त्यांनी सदर कायद्याच्या कलम १३ (४) आणि सदर नियम, २००२ च्या नियम ८ अन्वये त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून **१५ मे, २०२६** रोजी खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा सांकेतिक ताबा घेतला आहे.

विशेषतः वर नमूद केलेले कर्जदार/गहाणखतदार/जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सावध करण्यात येते की त्यांनी मालमत्तेशी कोणताही व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी केलेला कोणताही व्यवहार हा **बँक ऑफ बडोदा, प्रभादेवी शाखा** च्या **रु. १,४९,५४,४५२.६१/- (रुपये एक कोटी एकोणपन्नास लाख चौपन्न हजार चारशे बावन आणि पैसे एकसष्ठ फक्त)** रक्कम आणि त्यावरील व्याजाच्या प्रभाराच्या अधीन असेल.

सुरक्षित मालमत्ता सोडवण्यासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात कर्जदाराचे लक्ष कायद्याचे कलम (१३) च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे वेधले जात आहे.

स्थावर मालमत्तेचे वर्णन

फ्लॅट क्र. १४०१ च्या इक्विटेबल मॉर्गेजचा विस्तार, १४ व्या मजल्यावर, क्षेत्रफळ १५८५ चौ. फूट कार्पेट + १४०० चौ. फूट ओपन टेरेस क्षेत्र, "पुण्योदय पार्क" म्हणून ज्ञात इमारतीच्या विंग सी३ मध्ये आणि आता पुण्योदय पार्क सी-३ को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी लि. म्हणून ज्ञात सोसायटी, जे सर्व्हे क्र. ६५/८, ७५/१ आणि ७५/२, गाव वाडेघर, तालुका कल्याण आणि जिल्हा ठाणे, ४२१३०१ येथे स्थित जमिनीवर बांधले आहे आणि कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीत आणि नोंदणी जिल्हा ठाणे आणि उप-नोंदणी जिल्हा कल्याण मध्ये आहे, ज्याची मालकी श्री नीरज नवीन शाह आणि सौ. जिनाली नीरज शाह यांच्याकडे आहे.

फ्लॅट क्र. ३०२ च्या इक्विटेबल मॉर्गेजचा विस्तार, ३ ऱ्या मजल्यावर, ए विंग, इमारत क्र. ई-६, सर्वोदय हाइट्स म्हणून ज्ञात, नाहूर सर्वोदय हाइट्स को. ऑप. हाउसिंग सोसायटी लि., सर्वोदय पार्श्वनाथ नगर, जैन मंदिर रोड, मेहुल टॉकीज जवळ, नाहूर, मुलुंड (पश्चिम), मुंबई ४०००८०, क्षेत्रफळ १०८५.०२ चौ. फूट (ज्यामध्ये सामाईक क्षेत्र आणि सुविधा क्षेत्र १८४.९८ चौ. फूट बिल्ट अप क्षेत्राचा समावेश आहे) जे १००.८० चौ. मीटर बिल्ट अप क्षेत्राच्या समतुल्य आहे व एकत्रितपणे एक (१) कार पार्किंग जागेसह जे सर्व्हे क्र. ४१/३, ४२/१, ४३, १०३/१, १०४/२, १०५/१, १०६, १०७, १०८/१ पारडी क्र. १ आण